# मुंबई बंदर विश्वस्त मंडळ

# कर्मचारी
# (वर्गीकरण, नियंत्रण व अपील)

# विनियम, १९७६

**अनुवाद -**
**‘भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य’**
**टीप -**
**संदिग्धता असल्यास इंग्रजी पाठ ग्राहय मानला जाईल.**

**Translated by –**
**'Bhasha Sanchalanalaya, Maharashtra Rajya'**
**Note –**
**In case of ambiguity, English version shall prevail.**

# मुंबई बंदर विश्वस्त मंडळ कर्मचारी

## (वर्गीकरण, नियंत्रण व अपील)

## विनियम, १९७६.

---

जी.एस.आर.६४३ - प्रमुख बंदर विश्वस्त मंडळ अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) याच्या कलम १२६ तसेच कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख), कलम २५ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख), कलम २५ च्या पोटकलम (२) च्या खंड (ख) आणि कलम २८ च्या खंड (क) आणि (ख) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकार, याद्वारे, पुढील पहिले विनियम करीत आहे:-

## भाग - एक

## सर्वसाधारण

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ** - (१) या विनियमांस, मुंबई बंदर विश्वस्त मंडळ कर्मचारी (वर्गीकरण, नियंत्रण व अपील) विनियम, १९७६ असे म्हणावे.

(२) ते, राजपत्रात त्यांची प्रसिध्दी केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या** - या विनियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(क) 'अधिनियम' याचा अर्थ, प्रमुख बंदर विश्वस्त मंडळ अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८) असा आहे;

(ख) कर्मचा-यांच्या संबंधात 'नियुक्ती प्राधिकारी' याचा अर्थ, या विनियमांद्वारे तसे विहित केलेला प्राधिकारी असा आहे;

(ग) 'मंडळ', 'अध्यक्ष', 'उपाध्यक्ष ' आणि 'विभागप्रमुख' यांना, या अधिनियमात अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल;

(घ) 'शिस्तभंग विषयक प्राधिकारी' याचा अर्थ, विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा कर्मचा-यावर लादण्यासाठी या विनियमांखाली सक्षम असणारा प्राधिकारी, असा आहे;

(ङ) 'कर्मचारी' याचा अर्थ मंडळाचा कर्मचारी असा आहे आणि त्यात विदेशी सेवेतील किंवा जिची सेवा मंडळाच्या कामासाठी तात्पुरती देण्यात आली आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा आणि तसेच जिची सेवा मंडळाच्या कामासाठी तात्पुरती देण्यात आली आहे अशी केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा स्थानिक अथवा इतर प्राधिकरणाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो;

(च) 'अनुसूची' याचा अर्थ, या विनियमांना जोडलेली अनुसूची, असा आहे.

३. **प्रयुक्ति** - (१) हे विनियम, मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना लागू असतील, परंतु -

(क) नैमित्तिक सेवायोजनातील कोणत्याही व्यक्तीस;

(ख) एक महिन्यापेक्षा कमी असेल अशा मुदतीची नोटीस देऊन सेवामुक्त करण्यास अधीन असणा-या कोणत्याही व्यक्तीस;

(ग) अशा तरतुदींद्वारे समाविष्ट असलेल्या बाबींच्या संबंधात, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा त्याअन्वये, या विनियमांद्वारे समाविष्ट असलेल्या बाबींच्या संबंधात जिच्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीस,

हे विनियम लागू होणार नाहीत.

(२) पोट विनियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्ष, आदेशाद्वारे आणि क्रेंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमाच्या कलम २४ च्या पोट कलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्देश केलेल्या कर्मचा-याशी जेथवर ते संबंधित असेल तेथवर, कोणत्याही कर्मचा-याला किंवा कर्मचा-यांच्या वर्गाला या विनियमांच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रवर्तनातून वगळू शकेल.

(३) हे विनियम किंवा त्यांपैकी कोणतेही विनियम एखाद्या व्यक्तीला लागू होतात किंवा कसे याबाबत कोणतीही शंका उद्‌भवली तर, ती बाब, केंद्र सरकारकडे विचारार्थ पाठविण्यात येईल आणि ते त्यावर निर्णय घेईल.

## भाग दोन

# वर्गीकरण

४. **पदांचे वर्गीकरण -** या विनियमांच्या प्रयोजनासाठी मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व पदांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येईल:-

(क) वर्ग-एकची पदे, म्हणजेच; ज्या पदांचे कमाल वेतन किंवा वेतनमान [1][दि.१.१.१९९७ पासून अंमलात आलेल्या वेतन संरचनेमध्ये रु१५,१०० किंवा त्यापेक्षा अधिक असेल].

(ख) वर्ग-दोनची पदे, म्हणजेच; ज्या पदांचे कमाल वेतन किंवा वेतनमान [1][दि.१.१.१९९७ पासून अंमलात आलेल्या वेतन संरचनेमध्ये रु११,९७५ पेक्षा अधिक परंतु रु१५,००० पेक्षा कमी असेल].

(ग) वर्ग-तीनची पदे म्हणजेच; ज्या पदांचे कमाल वेतन किंवा वेतनमान [2][रुपये ३०८५] पेक्षा अधिक परंतु [1][दि.१.१.१९९७ पासून अंमलात आलेल्या वेतन संरचनेमध्ये रु६,८६० पेक्षा अधिक असेल परंतु रु११,९७५ पेक्षा अधिक नसेल] पेक्षा अधिक नसेल.

(घ) वर्ग चारची पदे म्हणजेच; ज्या पदांचे कमाल वेतन किंवा वेतनमान [2][दि.१.१.१९९७ पासून अंमलात आलेल्या सुधारित वेतन संरचनेमध्ये रु६,८६० किंवा त्योपक्षा कमी असेल].

---

१. दिनांक १०.९.१९९६ च्या टीआर क्र.२६० द्वारे दाखल केले; जीएसआर क्र.५९७(ई) दिनांक ३१.१२.१९९६.

२. दिनांक २०.६.१९९५ च्या टीआर क्र.२२३ द्वारे दाखल केले; जीएसआर क्र.३७८(ई) दिनांक २८.८.१९९६.

**भाग III**

# नियुक्ती प्राधिकारी

५. **नियुक्ती प्राधिकारी** - (१) [१][कमाल रु.५११५० पेक्षा अधिक कमाल वेतन किंवा वेतनमान असणा-या] वर्ग-एकच्या पदांवरील सर्व नियुक्त्या (अधिनियमाच्या कलम २४ च्या पोट कलम (१) च्या खंड (क) मध्ये समाविष्ट असलेल्या पदांव्यतिरिक्त) अध्यक्षां द्वारे करण्यात येतील.

(२) [१][(क) रु.१६७५० पेक्षा अधिक नसेल इतके कमाल वेतन किंवा वेतनमान असणा-या वर्ग-एकच्या पदांवरील]

आणि (ख) वर्ग-दोनच्या पदांवरील,

सर्व नियुक्त्या उपाध्यक्ष करील.

(३) एखाद्या विभागातील [२][रु.९५०० पेक्षा अधिक कमाल वेतन किंवा वेतनमान असणा-या] वर्ग-तीनच्या पदावरील सर्व नियुक्त्या त्या विभागाच्या विभागप्रमुखाद्वारे करण्यात येतील.

(४) पोटविनियम (३) मध्ये समाविष्ट नसलेल्या वर्ग-तीनच्या पदावरील सर्व नियुक्त्या आणि एखाद्या विभागातील वर्ग-चारच्या पदावरील सर्व नियुक्त्या, त्या विभागाच्या प्रमुखाद्वारे किंवा त्या विभागाच्या प्रमुखाद्वारे वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात येईल अशा त्या विभागाच्या उप विभाग प्रमुखाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याद्वारे (अशा अधिका-यांद्वारे) करण्यात येतील.

६. **तो दुय्यम असणा-या इतर प्राधिका-यास त्याचे अधिकार वापरण्याचा अधिकार:-** विनियम ५ द्वारे विहित केलेल्या प्राधिका-याद्वारे वापरण्या योग्य असलेले पदांची नियुक्ती करण्याचे अधिकार, त्या प्राधिका-यापेक्षा उच्च दर्जाच्या अन्य प्राधिका-याद्वारे देखील वापरता येतील.

---

१. दिनांक १०.९.१९९६ च्या टीआर क्र.२६० द्वारे दाखल केले; जीएसआर क्र.५९७(ई) दिनांक ३१.१२.१९९६.

२. दिनांक २०.६.१९९५ च्या टीआर क्र.२२३ द्वारे दाखल केले; जीएसआर क्र.३७८(ई) दिनांक २२.८.१९९६.

**भाग IV**

# निलंबन

७. **निलंबन** - (1) एखाद्या कर्मचा-यास, पुढील परिस्थितीत निलंबनाधीन ठेवता येईल:

(क) जेव्हा अध्यक्षाच्या मते, तो कर्मचारी राज्याच्या हितास किंवा सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा कामात गुंतलेला असेल; किंवा

(ख) जेव्हा त्याच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही अभिप्रेत असेल किंवा प्रलंबित असेल; किंवा

(ग) जेव्हा कोणत्याही फौजदारी अपराधाच्या बाबतीत त्याच्याविरूद्धचे प्रकरण अन्वेषणाधीन किंवा न्यायचौकशीअधीन असेल.

(२) निलंबनाचे आदेश -

(क) अधिनियमाच्या कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्देश केलेल्या कर्मचा-याच्या बाबतीत अध्यक्षाद्वारे काढण्यात येतील; आणि

(ख) इतर कोणत्याही कर्मचा-याच्या बाबतीत, नियुक्ती प्राधिका-याद्वारे काढण्यात येतील.

परंतु, कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्मचा-याच्या संबंधातील असा कोणताही आदेश, केंद्र सरकारच्या मान्यतेशिवाय लागू होणार नाही.

(३) एखादा कर्मचारी, केंद्र सरकारच्या मान्यतेने अध्यक्षाच्या किंवा यथास्थिति; नियुक्ती प्राधिका-याच्या आदेशान्वये पुढीलप्रमाणे निलंबनाधीन असल्याचे मानण्यात येईल:-

(क) जर त्याला फौजदारी गुन्हयामुळे किंवा अन्यथा अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी कोठडीत स्थानबध्द केले असेल तर त्याला स्थानबध्द केल्याच्या दिनांकापासून;

(ख) जर त्याला एखाद्या अपराधासाठी दोषसिध्द ठरविल्यास, त्याला अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक कालावधीसाठी कारावासाची शिक्षा झाली असेल आणि अशा दोषसिध्दीमुळे त्याला तात्काल बडतर्फ केले नसेल किंवा कामावरून काढून टाकले नसेल किंवा सक्तीने सेवानिवृत्त केले नसेल तर, त्याच्या दोषसिध्दीच्या दिनांकापासून.

**स्पष्टीकरण** : खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेला अठ्ठेचाळीस तासांचा कालावधी, दोषसिध्दी नंतरच्या कारावासाच्या प्रारंभापासून गणना करण्यात येईल आणि या प्रयोजनासाठी कारावासाचा खंडित कालावधी, कोणताही असल्यास, हिशेबात धरण्यात येईल.

(४) जर निलंबनाधीन कर्मचा-यावर लादण्यात आलेली, सेवेतून बडतर्फ केल्याची, काढून टाकल्याची किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीची शिक्षा, अपिलात या विनियमांन्वये किंवा पुनर्विलोकनात रद्द करण्यात आली असेल आणि हे प्रकरण पुढील चौकशीसाठी किंवा कार्यवाहीसाठी अथवा इतर कोणत्याही निदेशांसाठी पाठवण्यात आले असेल तर, त्याच्या निलंबनाचा आदेश, बडतर्फ केल्याच्या, काढून टाकल्याच्या किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या मूळ आदेशाच्या दिनांकास आणि त्या दिनांकापासून नियमितपणे अमंलात असल्याचे मानण्यात येईल आणि तो पुढील आदेश होईपर्यंत लागू असेल.

(५) जर एखाद्या कर्मचा-यावर लादण्यात आलेली, सेवेतून बडतर्फ केल्याची, काढून टाकल्याची किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीची शिक्षा, न्यायालयाच्या निर्णयामुळे किंवा न्यायालयाच्या निर्णयाद्वारे रद्द करण्यात आली असेल किंवा अवैध असल्याचे घोषित करण्यात आले किंवा ती अमान्य ठरविण्यात आली असेल आणि शिस्तभंगविषयक प्राधिका-याने, प्रकरणाची परिस्थिती विचारात घेतल्यावर, आधी लादण्यात आलेल्या सेवेतून बडतर्फ केल्याच्या, काढून टाकल्याच्या किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या शिक्षेवरील अभिकथनांवर, त्याच्याविरूध्द आणखी चौकशी करण्याचे ठरविले असेल तर, सेवेतून बडतर्फ केल्याच्या, काढून टाकल्याच्या किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या मूळ आदेशाच्या दिनांकापासून नियुक्ती प्राधिका-याने अशा कर्मचा-यास निलंबनाधीन ठेवले असल्याचे मानण्यात येईल आणि तो पुढील आदेश होईपर्यंत नियमितपणे निलंबनाधीन असेल.

परंतु, जो पर्यंत, जेव्हा न्यायालयाने प्रकरणाचे गुणदोष पडताळून न पाहता केवळ तांत्रिक कारणांवरून आदेश दिला असेल तेव्हा जर परिस्थितीस सामोरे जाण्याचा इरादा नसेल, तर आणखी अशी कोणतीही चौकशी करण्याचा आदेश देण्यात येणार नाही.

(६) (क) या विनियमांन्वये दिलेला किंवा दिला असल्याचे मानण्यात आलेला निलंबनाचा आदेश, तो काढण्यास सक्षम असणा-या प्राधिका-यांद्वारे त्यात

फेरबदल करण्यात येईपर्यंत किंवा तो रद्द करण्यात येईपर्यंत अंमलात असेल.

(ख) जेव्हा एखाद्या कर्मचा-यास निलंबित करण्यात आले असेल (कोणत्याही शिस्तभंगविषयक कार्यवाही संबंधात किंवा अन्यथा) आणि ते निलंबन चालू असताना त्याच्याविरूध्द इतर कोणतीही शिस्तभंगविषयक कार्यवाही चालू झाली असेल तेव्हा, त्याला निलंबनाधीन ठेवण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, लेखी कारणे नमूद करून असा निदेश देईल की, तो कर्मचारी अशा सर्व किंवा कोणतीही कार्यवाही, समाप्त होईपर्यंत नियमितपणे निलंबनाधीन असेल.

(७) या विनियमांन्वये दिलेला किंवा दिलेला असल्याचे मानण्यात आलेला निलंबनाचे आदेश ज्या प्राधिका-याने आदेश दिला किंवा दिलेला असल्याचे मानण्यात आले त्या प्राधिका-याद्वारे अथवा ज्यास तो प्राधिकारी दुय्यम आहे अशा कोणत्याही प्राधिका-याद्वारे त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत किंवा तो रद्द करण्यात येईपर्यंत अंमलात असेल.

**भाग V**

# शिक्षा व शिस्तभंग विषयक प्राधिकारी

८. **शिक्षा -** एखाद्या कर्मचा-यास, उचित आणि पुरेशा कारणास्तव व यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे, पुढील शिक्षा लादता येईल:-

**किरकोळ शिक्षा :**

(एक) ठपका ठेवणे;

(दोन) पदोन्नती रोखून ठेवणे;

(तीन) कर्मचा-याच्या निष्काळजीपणामुळे किंवा त्याने आदेशांचा भंग केल्यामुळे मंडळाला झालेल्या कोणत्याही आर्थिक स्वरूपाच्या हानीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग त्याच्या वेतनामधून वसूल करणे;

(चार) वेतनवाढी रोखून ठेवणे.

**जबर शिक्षा :**

(पाच) विनिर्दिष्ट कालावधीकरिता वेतनाच्या समय श्रेणीतील निम्न टप्प्यावर आणणे, त्याचबरोबर अशाप्रकारे समय श्रेणीतील निम्न टप्प्यावर आणल्याच्या काळात, कर्मचा-याला वेतनवाढी मिळतील किंवा मिळणार नाहीत याबाबत आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर असे निम्न टप्प्यावर आणल्यामुळे, त्याच्या भावी वेतनवाढी पुढे ढकलण्यात येतील किंवा येणार नाहीत, या संबंधीच्या निदेशांसह विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समय श्रेणीतील निम्न टप्प्यावर आणणे;

(सहा) कर्मचा-यास तो ज्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये किंवा पदावर असेल त्यापेक्षा खालच्या वेतन समयश्रेणीमध्ये, श्रेणीमध्ये किंवा पदावर पदावनत करणे, कर्मचा-याला ज्या वेतन समयश्रेणीतून, श्रेणीतून किंवा पदावरून पदावनत करण्यात आले असेल, त्या वेतन समयश्रेणीतील, श्रेणीतील किंवा पदावरील बढतीस अशी पदावनती सर्वसाधारणपणे रोधक ठरेल, मग, अशा आदेशामध्ये कर्मचा-यास पूर्वीच्या वेतन समयश्रेणीत, श्रेणीत किंवा पदावर परत आणण्यासंबंधीच्या अटी, कर्मचा-याची जेष्ठता व त्याचे वेतन यासंबंधीच्या निदेशांचा उल्लेख केलेला असो किंवा नसो;

(सात) सक्तीची सेवानिवृत्ती;

(आठ) सेवेतून काढून टाकणे. मात्र भावी काळात मंडळाच्या अधीन असलेली नोकरी मिळण्याच्या दृष्टीने ही अनर्हता ठरणार नाही;

(नऊ) सेवेतून बडतर्फ करणे, मात्र भावी काळात मंडळाच्या अधीन असलेली नोकरी मिळण्याच्या दृष्टीने सर्वसाधारणपणे ही अनर्हता ठरेल.

**स्पष्टीकरण :** या विनियमांच्या अर्थांतर्गत, पुढील गोष्टी या शिक्षा ठरणार नाहीत:

(एक) कर्मचारी ज्या सेवेत असेल ती सेवा किंवा तो धारण करीत असलेले पद ज्या नियमांद्वारे किंवा आदेशांद्वारे विनियमित केले जात असेल त्या नियमांनुसार व आदेशांनुसार किंवा त्याच्या नियुक्तीच्या शर्तीनुसार, कोणत्याही विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यात कसूर केल्याबद्दल वेतनवाढी रोखून ठेवणे;

(दोन) कर्मचारी दक्षतारोध पार करण्यास अयोग्य असल्याच्या कारणावरून समयश्रेणीतील दक्षतारोधावर त्याची वेतनवाढ थांबवणे;

(तीन) ज्या श्रेणीत किंवा पदावर बढती मिळवण्यास कर्मचारी पात्र ठरला असता, त्या श्रेणीसाठी किंवा पदासाठी कर्मचा-याच्या प्रकरणाचा विचार केल्यानंतर मग ती बढती कायम किंवा स्थानापन्न असो- बढती न देणे;

(चार) उच्च श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न असणा-या कर्मचा-याला, तो अशा उच्च श्रेणीत किंवा पदावर काम करण्यास अयोग्य आहे या कारणावरुन किंवा त्याच्या वर्तणुकीशी संबंधित नसणा-या कोणत्याही प्रशासकीय कारणावरुन निम्न श्रेणीत किंवा पदावर पदावनत करणे;

(पाच) दुस-या श्रेणीत किंवा पदावर परिवीक्षाधीन नियुक्ती केलेल्या कर्मचा-याला, नियुक्तीच्या अटींनुसार किंवा अशा परिवीक्षेचे विनियमीत करणारे विनियम किंवा आदेश यांनुसार परिवीक्षा काळामध्ये किंवा परिवीक्षा काळाच्या अखेरीस त्याच्या कायम श्रेणीत किंवा पदावर पदावनत करणे;

(सहा) केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही प्राधिकरणाकडून ज्याच्या सेवा उसन्या घेण्यात आल्या होत्या त्या कर्मचा-याच्या सेवा, ज्या प्राधिकरणाने उसनवार दिल्या होत्या त्या प्राधिकरणाकडे, सेवा सुपूर्द करणे;

(सात) कर्मचा-याचा नियत सेवावधी किंवा सेवानिवृत्ती यासंबंधीच्या तरतुदींनुसार त्याला सक्तीने सेवानिवृत्त करणे;

(आठ) **सेवेतून काढणे:**

(क) परिवीक्षाधीन नियुक्ती केलेल्या कर्मचा-याची सेवा त्याच्या परिवीक्षा काळामध्ये किंवा त्याच्या अखेरीस, त्याच्या नियुक्तीच्या अटींनुसार किंवा अशा परिवीक्षेचे विनियमित करणारे नियम व आदेश यांनुसार समाप्त करणे;

(ख) करारानुसार नियुक्त केलेल्या कर्मचा-याची सेवा, अशा कराराच्या अटींनुसार समाप्त करणे;

(ग) अस्थायी कर्मचा-यांची सेवा, त्याच्या वर्तणुकीची संबंधित नसलेल्या कारणावरुन समाप्त करणे.

९. **सेवाप्रवेशापूर्वी केलेल्या गैरवर्तणुकीबाबत शिक्षा**: विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे योग्य व पुरेशा कारणास्तव, थेट सेवाप्रवेशाद्वारे नेमणूक केलेल्या कर्मचा-याच्या बाबतीत, त्याच्या सेवायोजनापूर्वी केलेल्या गैरवर्तणुकीकरिता - जर त्याच्या गैरवर्तणुकीचा, सध्याच्या सेवायोजनाशी संयुक्तिक संबंध असेल आणि तो सेवेत राहण्यास अक्षम अथवा अयोग्य असेल तर, लादण्यात येतील.

१०. **शिस्तभंगविषयक प्राधिकारी**: अनुसूचीमध्ये नमूद केलेले प्राधिकारी उक्त अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे कर्मचा-यांवर शिक्षा लादण्यास सक्षम असतील.

११. **कार्यवाही सुरुकरणारा प्राधिकारी** : (१) अध्यक्षांस-

(क) कोणत्याही कर्मचा-याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरुकरता येईल;

(ख) या विनियमांनुसार ज्या कर्मचा-याला विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादण्यास जे शिस्तभंगविषयक प्राधिकार सक्षम असतील अशा शिस्तभंगविषयक प्राधिका-यास कोणत्याही कर्मचा-याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरुकरण्याचा निदेश देता येईल.

(२) विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा लादण्यास सक्षम असणा-या शिस्तभंगविषयक प्राधिका-यास विनिमय ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी ज्या कोणत्याही शिक्षा लादण्यासाठी कोणत्याही कर्मचा-याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरुकरता येईल, मग असा शिस्तभंगविषयक प्राधिकारी, या शिक्षांपैकी दुसरी कोणतीही शिक्षा लादण्यास या विनियमान्वये सक्षम असला, तरीही.

**भाग VI**

# शिक्षा लादण्याबाबतची कार्यपध्दती

१२. **जबर शिक्षा लादण्याबाबतची कार्यपध्दती** - (१) शक्य असेल तेथवर या विनियमामध्ये आणि विनियम १३ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने चौकशी केल्याशिवाय, विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा लादणारा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) जेव्हा जेव्हा कर्मचा-याविरुध्द गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या कोणत्याही आरोपातील सत्य परिस्थितीची चौकशी करण्यास पुरेसा आधार आहे असे शिस्तभंगविषयक प्राधिका-याचे मत असेल तेव्हा, तो प्राधिकारी, स्वत: चौकशी करु शकेल किंवा या विनियमान्वये त्यासाठी प्राधिकारी नियुक्त करुन सत्य परिस्थितीची पडताळणी करुशकेल.

**स्पष्टीकरण** - जेव्हा शिस्तभंगविषयक प्राधिकारी स्वत: चौकशी करीत असेल त्या बाबतीत, या विनियमान्वये चौकशी प्राधिका-याचा केलेला कोणताही उल्लेख हा, शिस्तभंगविषयक प्राधिका-याचा उल्लेख असल्याचे मानण्यात येईल.

(३) जेव्हा या विनियमान्वये आणि विनियम १३ अन्वये कर्मचा-याविरुध्द चौकशी करण्याचे प्रस्तावित केले असेल त्याबाबतीत, शिस्तभंगविषयक प्राधिकारी, स्वत: पुढील गोष्टी तयार करील किंवा तयार करवून घेईल:-

(एक) गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचा सारांश तयार करुन दोषारोपांच्या बाबी निश्चित व सुस्पष्ट स्वरुपात मांडणे;

(दोन)दोषारोपाच्या प्रत्येक बाबीच्या पुष्टयर्थ गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन यासंबंधीच्या आरोपांचे विवरण तयार करणे, त्यात पुढील बाबीचा अंतर्भाव असेल:

(क) कर्मचा-याने दिलेली कोणतीही कबुली किंवा कबुलीजबाब यांसह सर्व संबध्द तथ्यांचे विवरण;

(ख) ज्यांच्या आधारे दोषारोपाच्या बाबी प्रमाणित करावयाचे प्रस्तावित असेल त्या कागदपत्रांची यादी व ज्यांनी साक्षी दिल्या असतील त्या साक्षीदारांची यादी.

**टीप - जर एखाद्या कर्मचा-याने पोट-विनियम (३) मध्ये निर्देश केलेल्या यादीत नमूद केलेल्या साक्षीदारांच्या विवरणाच्या प्रती पुरविण्याबाबत तोंडी मागणी केली असेल किंवा लेखी अर्ज केला असेल तर, शिस्तभंगविषयक प्राधिकारी, शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत, शिस्तभंगविषयक प्राधिका-याच्या वतीने साक्षीदारांची तपासणी सुरु होण्यापूर्वी तीन दिवसांच्या आत, त्याला अशा प्रती पुरवील.**

(४) शिस्तभंगविषयक प्राधिकारी, कर्मचा-याकडे त्याच्यावरील दोषारोपांच्या बाबींची प्रत, गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र आणि ज्यांच्या आधारे दोषारोपाची प्रत्येक बाब सिध्द करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या कागदपत्रांची यादी व साक्षीदारांची यादी सुपूर्द करील किंवा सुपूर्द करण्याची व्यवस्था करील, आणि विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कालावधीत, शासकीय कर्मचा-याने आपले बचावाचे लेखी निवेदन आणि व्यक्तीशः बाजू मांडण्याची त्याची इच्छा आहे किंवा कसे हे नमूद करावे असे त्यास फर्मावील.

(५) (क) बचावाचे लेखी निवेदन मिळाल्यावर, शिस्तभंगविषयक प्राधिकारी, दोषारोपाच्या ज्या बाबी कबूल केलेल्या नसतील अशा बाबींची जातीने चौकशी करील, किंवा त्या प्रयोजनासाठी, चौकशी प्राधिका-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे त्याला वाटल्यास, तो पोट-विनियम (२) अन्वये तशी नियुक्ती करु शकेल आणि ज्या बाबतीत कर्मचा-याने आपल्या बचावाच्या लेखी निवेदनात दोषारोपाच्या सर्व बाबींची कबुली दिलेली असेल त्या बाबतीत, शिस्तभंगविषयक प्राधिकारी, त्याला योग्य वाटेल तो पुरावा ग्राहय मानून प्रत्येक दोषारोपावरील आपले निष्कर्ष नोंदवील आणि विनियम १३ मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीने कार्यवाही करील.

(ख) जर कर्मचा-याने बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केलेले नसेल तर, शिस्तभंगविषयक प्राधिका-यास, स्वतः दोषारोपांची चौकशी करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी चौकशी प्राधिका-याची नियुक्ती करणे आवश्यक आहे असे त्याला वाटल्यास, पोट-विनियम (२) अनुसार त्याला तशी नियुक्ती करता येईल.

(ग) जेव्हा शिस्तभंगविषयक प्राधिकारी, कोणत्याही दोषारोपांच्या बाबींची स्वतः चौकशी करीत असेल किंवा अशा दोषारोपांची चौकशी करण्यासाठी त्याने कोणत्याही चौकशी प्राधिका-याची नियुक्ती केली असेल त्याबाबतीत तो, आदेशाद्वारे दोषारोपांच्या बाबींच्या पुष्टयर्थ त्याच्यावतीने प्रकरण सादर करण्यासाठी, "सादरकर्ता अधिकारी" म्हणून संबोधण्यात यावयाच्या कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करील.

(६) शिस्तभंग विषयक प्राधिकारी हा, ज्या बाबतीत चौकशी प्राधिकारी नसेल, त्या बाबतीत तो, खालील गोष्टी चौकशी प्राधिका-याकडे अग्रेषित करील:-

(क) दोषारोपांच्या प्रत्येक बाबीची प्रत आणि गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र;

(ख) कर्मचा-याने बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केले असल्यास त्याची प्रत;

(ग) पोट-विनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या साक्षीदारांनी कोणतीही निवेदने केलेली असल्यास त्याची प्रत;

(घ) पोट-विनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्मचा-याला कागदपत्रे पोचवण्यात आल्याचे सिध्द करणारा पुरावा; आणि

(ड) उक्त "सादरकर्त्या अधिका-याच्या" नियुक्ती आदेशाची प्रत.

(७) कर्मचारी, चौकशी प्राधिका-याने यासंदर्भात लेखी नोटिशीद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दिनांकास व अशा वेळी किंवा चौकशी प्राधिकारी मुभा देईल अशा इतर वेळी, स्वत: चौकशी प्राधिका-यापुढे हजर होईल.

(८) कर्मचारी इतर कोणत्याही कर्मचा-याचे किंवा कर्मचारी हा तृतीयश्रेणी अथवा चतुर्थश्रेणी कर्मचारी असेल तर, तो ज्या युनियनमध्ये असेल, त्या युनियनचा सदस्य असेल त्या युनियनच्या, भारतीय व्यवसाय संघ अधिनियम, १९२६ (१९२६ चा १६) याच्या कलम २ च्या खंड (घ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे "पदाधिका-यांची" त्याच्या वतीने त्याचे प्रकरण सादर करण्यासाठी मदत घेऊ शकेल. परंतु, या प्रयोजनासाठी, शिस्तभंगविषयक प्राधिका-याने नियुक्त केलेला "सादरकर्ता अधिकारी" हा विधि व्यवसायी असल्याखेरीज किंवा प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन, शिस्तभंगविषयक प्राधिका-याने तशी मदत घेण्याची परवानगी दिली असल्याखेरीज अन्यथा विधि व्यवसायीची मदत घेऊ शकणार नाही.

**[1]टीप - कर्मचारी, ज्या प्रकरणात त्याला उपस्थित राहून मदत करावयाची असेल अशी दोन प्रलंबित शिस्तभंगविषयक प्रकरणे ज्याच्या हाती असतील अशा मंडळाच्या इतर कोणत्याही कर्मचा-याची मदत घेऊ शकणार नाही.**

(९) ज्याने आपल्या बचावाच्या लेखी निवेदनात दोषारोपाच्या एकाही बाबीसंबंधी कबुली दिलेली नसेल किंवा बचावाचे लेखी निवेदन सादर केलेले नसेल तर असा कर्मचारी चौकशी आधिका-यापुढे हजर होईल तेव्हा असा प्राधिकारी, त्या कर्मचा-याला तो दोषी आहे किंवा कसे अथवा त्याला कोणत्याही स्वरूपाचा बचाव करावयाचा आहे किंवा कसे हे विचारु शकेल आणि जर दोषारोपाच्या कोणत्याही बाबीसंबंधात दोषी असल्याबद्दल तो आपला युक्तिवाद करीत असेल तर, चौकशी प्राधिकारी, त्याचा यक्तिवाद नमूद करून ठेवील, त्या अभिलेखावर सही करील व त्यावर शासकीय कर्मचा-याचीही सही घेईल.

---

१. दिनांक ५.८.१९७९ च्या टीआर क्रमांक १४० द्वारे समाविष्ट केले. दिनांक ५.१.१९८० रोजी व तेव्हा पासून.

(१०) कर्मचा-याने ज्या दोषारोपांबाबत युक्तिवाद केला असेल त्यासंबंधात, चौकशी प्राधिकारी, त्या आरोपाच्या सिध्दतेबाबतचे आपले निष्कर्ष सादर करील.

(११) जर कर्मचारी, विहित कालावधीमध्ये चौकशी प्राधिका-यासमोर उपस्थित राहण्यात कसूर करीत असेल किंवा आपली बाजू मांडण्याचे नाकारीत असेल किंवा बाजू मांडल्याचे टाळीत असेल तर, चौकशी प्राधिकारी, सादरकर्ता अधिका-यास, त्याने ज्यांच्या आधारे दोषारोप सिध्द करण्याचे प्रस्तावित केले आहे, तो पुरावा सादर करण्यास भाग पाडील आणि कर्मचारी आपल्या बचावाची तयारी करण्यासाठी पुढील गोष्टी करु शकेल अशा आदेशाची नोंद केल्यानंतर तीस दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या नंतरच्या तारखेपर्यंत प्रकरण स्थगित ठेवील,

(एक) आदेशाच्या तारखेपासून पाच दिवसांच्या आत किंवा चौकशी प्राधिकारी परवानगी देईल अशा पाच दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या आणखी कालावधीमध्ये पोट नियम (३) मध्ये निर्देश केलेल्या यादीमधील कागदपत्रांचे निरीक्षण करणे;

(दोन) त्याच्या वतीने तपासणी करण्यात यावयाच्या साक्षीदारांची यादी सादर करणे;

(तीन) जी कागदपत्रे मंडळाच्या ताब्यात आहेत; परंतु पोटविनियम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीमध्ये जी नमूद केलेली नाहीत, अशा कागदपत्रांचा शोध घेणे, किंवा ती सादर करणे यासाठी आदेशापासून १० दिवसांच्या आत किंवा चौकशी प्राधिकारी परवानगी देईल अशा दहा दिवसांपेक्षा अधिक नसलेल्या नंतरच्या कालावधीमध्ये नोटीस देणे.

**टीप -** **कर्मचारी, मंडळाने शोधून काढावयाच्या किंवा सादर करावयाच्या त्याने आवश्यक केलेल्या संबध्द कागदपत्रांचा निर्देश करील.**

(१२) चौकशी प्राधिकारी, कर्मचा-याकडून कागदपत्रांचा शोध घेणे किंवा ती सादर करणे यासंबंधीची नोटीस मिळाल्यावर, उक्त कागदपत्रे ज्याच्या अभिरक्षेत किंवा ताब्यात असतील, त्या प्राधिका-याकडे ती नोटीस किंवा तिची प्रत पाठवील व त्यासह पाठवलेल्या मागणीपत्रात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस तशी कागदपत्रे सादर करण्याबाबत कळवील:

परंतु, चौकशी प्राधिकारी, त्याच्या मते प्रकरणाशी संबंधित नसलेल्या कागदपत्रांची मागणी करण्यास, लेखी कारणे नमूद करून, नकार देऊ शकेल.

(१३) उप विनियम (१२) मध्ये निर्दिष्ट केलेले मागणीपत्र मिळाल्यावर, मागणी केलेली कागदपत्रे अभिरक्षेत किंवा ताब्यात असणारा प्रत्येक प्राधिकारी, ती कागदपत्रे चौकशी प्राधिका-यास सादर करील:

परंतु मागणी केलेली कागदपत्रे ज्याच्या ताब्यात किंवा अभिरक्षेत असतील, त्या प्राधिका-याची जर खात्री पटली असेल की, अशी सर्व किंवा त्यापैकी कोणतीही कागदपत्रे सादर करणे हे बंदरांच्या हितास किंवा राज्याच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल, तर तो तशी कारणे लेखी नमूद करुन चौकशी प्राधिका-यास तसे कळवील आणि असे कळवण्यात आल्यावर, चौकशी प्राधिकारी, कर्मचा-याला ती माहिती कळवील व अशी कागदपत्रे शोधून काढण्याबाबत किंवा सादर करण्याबाबत त्याने केलेली मागणी मागे घेईल.

(१४) (क) ज्याच्या आधारे दोषारोप सिध्द करावयाचे प्रस्तावित केले असेल, तो मौखिक व कागदोपत्री पुरावा, चौकशीसाठी निश्चित केलेल्या तारखेला शिस्तभंगविषयक प्राधिका-याकडून किंवा त्याच्या वतीने सादर करण्यात येईल.

(ख) उक्त सादरकर्त्या अधिका-याद्वारे किंवा त्याच्या वतीने साक्षीदारांची तपासणी करण्यात येईल आणि कर्मचा-याद्वारे किंवा त्याच्या वतीने साक्षीदारांची उलट तपासणी करता येईल.

(ग) उक्त सादरकर्ता अधिकारी, साक्षीदारांची ज्या मुद्यांवर त्याने उलट तपासणी केलेली असेल त्यापैकी कोणत्याही मुद्याची फेरतपासणी करण्याचा हक्कदार असेल; परंतु चौकशी प्राधिका-याच्या परवानगीशिवाय कोणत्याही नवीन बाबींसंबंधात साक्षीदारांची फेरतपासणी करण्याचा हक्क त्याला असणार नाही.

(घ) चौकशी प्राधिका-यास, त्याला योग्य वाटतील असे प्रश्नसुध्दा साक्षीदारांना विचारता येतील.

(१५) (क) प्रकरण बंद करण्यापूर्वी, शिस्तभंगविषयक प्राधिका-याच्या वतीने, त्याला आवश्यक भासेल तर, चौकशी प्राधिकारी, स्वाधिकारे उक्त कर्मचा-याला दिलेल्या यादीत समावेश नसणारा पुरावा सादर करण्यास सादरकर्त्या अधिका-यास परवानगी देऊ शकेल किंवा स्वत: होऊन नवीन पुराव्याची मागणी करु शकेल, किंवा कोणत्याही साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची फेरतपासणी करु शकेल आणि अशा प्रकरणी, कर्मचारी, जर त्याने तशी मागणी केल्यास, सादर करावयाचे प्रस्तावित असलेल्या आणखी

पुराव्यांच्या यादीची प्रत, मिळण्यास हक्कदार असेल आणि चौकशी प्राधिका-यास, संयुक्तिक वाटेल तेवढया काळापर्यंत चौकशी तहकूब करता येईल.

(ख) चौकशी प्राधिकारी, असे दस्तऐवज अभिलेखावर घेण्यापूर्वी, त्यांची तपासणी करण्याची कर्मचा-यास संधी देईल.

(ग) जर नवीन पुरावा सादर करणे न्यायाच्या हिताचे आहे असे चौकशी प्राधिका-याचे मत असेल, तर तो कर्मचा-यास असे नवीन पुरावे सादर करण्यास देखील परवानगी देईल.

**टीप - पुराव्यातील कोणतीही तफावत भरून काढण्यासाठी नवीन पुरावा सादर करण्यास परवानगी देता येणार किंवा त्यासाठी त्याची मागणी करता येणार नाही किंवा कोणत्याही साक्षीदाराला परत बोलावता येणार नाही. मुळातच सादर केलेल्या पुराव्यामध्ये अंगभूत उणीव किंवा दोष असेल तरच केवळ असा पुरावा मागवता येईल.**

(१६) (क) जेव्हा शिस्तभंगविषयक प्राधिका-याचे प्रकरण बंद झाले असेल तेव्हा कर्मचा-याला, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे तोंडी किंवा लेखी स्वरूपात त्याचा बचाव सादर करण्यास फर्माविण्यात येईल.

(ख) जर कर्मचा-याने तोंडी बचाव दिला असेल तर, त्याची अभिलेखात नोंद करण्यात येईल आणि कर्मचा-याला त्यावर सही करण्यास फर्माविण्यात येईल. दोहोपैंकी कोणत्याही बाबतीत, बचावाच्या निवेदनाची प्रत, कोणताही सादरकर्ता अधिकारी नियुक्त केला असेल तर, उक्त अधिका-यास देण्यात येईल.

(१७) (क) त्यानंतर कर्मचा-याच्या वतीने पुरावा सादर करण्यात येईल.

(ख) कर्मचारी, त्याला तसे वाटत असेल तर, त्याच्या वतीने स्वत:च तपासणी करु शकेल. त्यानंतर, कर्मचा-याने सादर केलेल्या साक्षीदारांची तपासणी केली जाईल आणि शिस्तभंगविषयक प्राधिका-याच्या साक्षीदारांसाठी लागू असणा-या तरतुदींनुसार चौकशी प्राधिका-याकडून उलट तपासणी, फेरतपासणी किंवा तपासणी केली जाण्यास देखील कर्मचारी पात्र असतील.

(१८) चौकशी प्राधिकारी, कर्मचा-याने त्याचे प्रकरण बंद केल्यानंतर आणि कर्मचा-याने स्वत: तपासणी केली नसेल तर, सर्वसाधारणपणे पुराव्यामध्ये कर्मचा-याविरुध्द दिसून येणा-या कोणत्याही परिस्थितीचे स्पष्टीकरण करणे त्याला शक्य व्हावे म्हणून त्या परिस्थितीबाबत प्रश्न विचारुशकेल.

(१९) चौकशी प्राधिकारी, पुरावा सादर करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर कोणी सादरकर्ता अधिकारी नियुक्त केलेला असल्यास, उक्त सादरकर्त्या अधिका-याचे आणि कर्मचा-याचे म्हणणे ऐकून घेईल किंवा त्यांना संबंधित प्रकरणाची लेखी टाचणे सादर करण्याची इच्छा असेल तर, त्यांना तसे करण्यास परवनागी देऊ शकेल.

(२०) ज्या कर्मचा-याला दोषारोपांच्या बाबींची प्रत देण्यात आली आहे त्याने त्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या तारखेला किंवा त्यापूर्वी बचावाचे लेखी निवेदन सादर केले नसेल किंवा तो चौकशी प्राधिका-यापुढे व्यक्तीश: उपस्थित झाला नसेल किंवा अन्यथा या विनियमाच्या तरतुदींचे पालन करण्यात त्याने कसूर केली असेल किंवा तसे करण्यास नकार दिला असेल तर, चौकशी प्राधिकारी एकतर्फी चौकशी करुशकेल.

(२१) (क) जेव्हा विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा करण्यास सक्षम असणा-या परंतु, विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा करण्यास सक्षम नसणा-या शिस्तभंगविषयक प्राधिका-याने, आरोपाच्या कोणत्याही बाबींची स्वत: चौकशी केली असेल किंवा करवून घेतली असेल आणि त्याचा स्वत:चा निर्णय किंवा त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही चौकशी प्राधिका-याने दिलेल्या कोणत्याही निष्कर्षावरील त्याचा निर्णय विचारात घेतल्यानंतर, कर्मचा-यावर विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा लादली पाहिजे असे त्याचे मत झाले असेल, त्या बाबतीत, तो प्राधिकारी, अशी नंतर नमूद केलेली शिक्षा लादण्यास सक्षम असेल अशा शिस्तभंगविषयक प्राधिका-याकडे चौकशीचा अभिलेख पाठवील.

(ख) ज्या शिस्तभंगविषयक प्राधिका-याकडे अशा प्रकारे अभिलेख पाठविण्यात आला असेल तो प्राधिकारी, अभिलेखाद्वारे मिळालेल्या पुराव्यावर कार्यवाही करुशकेल किंवा त्याच्या मते, न्यायहिताच्या दृष्टीने, कोणत्याही साक्षीदाराची आणखी तपासणी करणे आवश्यक असेल तर, त्या साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी, उलट तपासणी व फेरतपासणी करु शकेल आणि या विनियमांनुसार त्याला योग्य वाटेल अशी शिक्षा कर्मचा-यास लादू शकेल.

(२२) जेव्हा जेव्हा कोणताही चौकशी प्राधिकारी, एखाद्या चौकशीतील कर्मचा-याचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि संपूर्ण किंवा त्यापैकी कोणत्याही पुराव्याची नोंद केल्यानंतर, त्या चौकशीतील आपली अधिकारिता वापरण्याचे बंद झाले असेल तेव्हा आणि त्या प्राधिका-याच्या जागी अशी अधिकारिता असलेला दुसरा चौकशी प्राधिकारी नेमण्यात येत असेल व तो अशा अधिकारितेचा वापर करीत असेल तेव्हा, असा नंतर येणारा प्राधिकारी, पूर्वीच्या प्राधिका-याने नोंदवलेल्या पुराव्यावरुन किंवा अंशतः पूर्वीच्या प्राधिका-याने व अंशतः स्वतः नोंदवलेल्या पुराव्यावरुन कार्यवाही करु शकेल:

परंतु ज्यांची साक्ष या अगोदरच नोंदवण्यात आली आहे अशा साक्षीदारांपैकी कोणत्याही साक्षीदाराची अधिक तपासणी करणे न्यायहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे नंतर आलेल्या चौकशी प्राधिका-याचे मत असेल तर, त्या प्राधिका-यास, यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे अशा कोणत्याही साक्षीदाराला बोलावून त्याची तपासणी, उलट तपासणी आणि फेरतपासणी करता येईल.

(२३) (एक) चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी प्रधिका-याकडून अहवाल तयार करण्यात येईल आणि या अहवालात पुढील बाबींचा अंतर्भाव असेल:-

(क) दोषारोपांच्या बाबी आणि गैरवर्तनाच्या किंवा गैरवर्तणुकीच्या आरोपांचे विवरणपत्र;

(ख) दोषारोपांच्या प्रत्येक बाबीच्या संबंधात कर्मचा-याने केलेला बचाव;

(ग) दोषारोपाच्या प्रत्येक बाबीसंबंधातील पुराव्याचे मूल्यमापन;

(घ) दोषारोपाच्या प्रत्येक बाबींवरील निष्कर्ष आणि त्याची कारणे.

**स्पष्टीकरण: चौकशी प्राधिका-याच्या मते, चौकशीच्या कार्यवाहीमध्ये मूळ दोषारोपापेक्षा वेगळा दोषारोप सिध्द होत असेल, अशा बाबतीत, अशा दोषारोपांच्या संबंधातील आपले निष्कर्ष त्याला नोंदवता येतील:**

परंतु, असा दोषारोप ज्या तथ्यांवर आधारलेला असेल, ती तथ्ये कर्मचा-याने कबूल केली असल्याखेरीज किंवा अशा दोषारोपांविरुध्द स्वतःचा बचाव करण्याची वाजवी संधी त्यास देण्यात आल्याखेरीज अशा दोषारोपाचे निष्कर्ष नोंदवता येणार नाहीत.

(दोन) चौकशी प्राधिकारी हा स्वतः शिस्तभंगविषयक प्राधिकारी नसेल त्या बाबतीत तो, शिस्तभंग विषयक प्राधिका-याकडे चौकशीचे अहवाल पाठवील. या अहवालांमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल:

(क) खंड (एक) अन्वये त्याने तयार केलेला अहवाल;

(ख) कर्मचा-याने सादर केलेले कोणतेही असल्यास, त्याच्या बचावाचे लेखी निवेदन;

(ग) चौकशी चालू असताना, सादर करण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा;

(घ) चौकशीचे काम चालू असताना, उक्त सादरकर्त्या अधिका-याने किंवा कर्मचा-याने किंवा दोघांनी दाखल केलेली कोणतीही असल्यास लेखी टाचणे; आणि

(ङ) शिस्तभंग विषयक प्राधिका-याने आणि चौकशी प्राधिका-याने चौकशीच्या संबंधात दिलेले कोणतेही असल्यास, आदेश.

१३. **<u>चौकशी अहवालावरील कार्यवाही</u>** - (१) शिस्तभंग विषयक प्राधिकारी हा, जर तो स्वत: चौकशी प्राधिकारी नसेल तर, त्या बाबतीत त्याने लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी, अधिक चौकशीसाठी आणि अहवालासाठी प्रकरण चौकशी प्राधिका-याकडे पाठवू शकेल आणि त्यानंतर चौकशी प्राधिकारी, शक्य असेल तेथवर विनियम १२ च्या तरतुदींनुसार अधिक चौकशी करण्याकरिता कार्यवाही करील.

(२) शिस्तभंग विषयक प्राधिकारी, जर दोषारोपाच्या कोणत्याही बाबींच्या संबंधात चौकशी प्राधिका-याच्या निष्कर्षाशी सहमत नसेल तर, तो या प्रयोजनासाठी अभिलेखावर पुरेसा पुरावा असेल तर अशा मतभेदाची कारणे नोंदवील आणि अशा दोषारोपाबाबत स्वत:चे निष्कर्ष नोंदवील.

(३) जर शिस्तभंग विषयक प्राधिका-याचे, दोषारोपाच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधातील त्याचे निष्कर्ष विचारात घेता, कर्मचा-यावर विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेली शिक्षा लादण्यात यावी असे मत असेल तर, तो विनियम १४ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशी शिक्षा लादणारा आदेश काढील.

(४) (एक) जर शिस्तभंग विषयक प्राधिका-याचे, दोषारोपाच्या संबंधातील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसंबंधीचे त्याचे निष्कर्ष विचारात घेता, कर्मचा-याला विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा देण्यात यावी असे मत असेल तर, तो -

(क) दोषारोपाच्या प्रत्येक बाबीच्या संबंधातील त्याने केलेल्या चौकशीच्या अहवालाची व त्याच्या निष्कर्षाची एक प्रत, किंवा जेव्हा त्याने नेमलेल्या चौकशी प्राधिका-याने चौकशी केलेली

असेल त्याबाबतीत, अशा प्राधिका-याची अहवालाची एक प्रत आणि दोषारोपाच्या प्रत्येक बाबीच्या संबंधातील त्याच्या निष्कर्षांच्या विवरणाची एक प्रत पाठवील. त्याचबरोबर चौकशी प्राधिका-याच्या निष्कर्षांशी सहमत नसल्यास त्याच्या संक्षिप्त कारणांसह कर्मचा-यास सादर करील.

(ख) कर्मचा-याला, त्याला देण्याचे प्रस्तावित केलेली शिक्षा नमूद करणारी नोटीस पाठवील आणि नोटीशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकारी परवानगी देईल अशा पुढील कालावधीत विनियम १२ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीमध्ये सादर केलेल्या अद्ययावत पुराव्याच्या आधारे देण्यात यावयाच्या प्रस्तावित शिक्षेसंबंधात त्याला जे अभिवेदन सादर करण्याची इच्छा असेल ते अभिवेदन सादर करण्यास फर्मावील.

(दोन) ज्या प्रकरणी केंद्र सरकारशी विचारविनियम करणे आवश्यक असेल अशा प्रत्येक प्रकरणी, शिस्तभंगविषयक प्राधिकारी खंड (एक) अन्वये दिलेल्या नोटिशीच्या प्रतीसह चौकशीचा अभिलेख आणि अशा नोटिशीस अनुसरून कोणतेही असल्यास अभिवेदन त्याची एक प्रत आपल्या अभिप्रायांसह केंद्र सरकारकडे आदेशार्थ पाठवील.

(तीन) जेव्हा केंद्र सरकारशी विचारविनिमय करणे आवश्यक नसेल अशा प्रकरणी, शिस्तभंग विषयक प्राधिकारी खंड (एक) अन्वये कर्मचा-याला देण्यात आलेल्या नोटिशीस अनुसरून त्याने केलेले कोणतेही असल्यास त्याने केलेले अभिवेदन विचारात घेईल आणि त्याला शिक्षा द्यावयाची असल्यास, ती कोणत्या स्वरूपाची असावी, ते निश्चित करील व त्याला वाटेल असा आदेश काढील.

**१४. किरकोळ शिक्षा देण्याची पध्दत** - (१) विनियम १२ च्या पोट विनियम (३) मधील तरतुदींच्या अधीनतेने, विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देण्यासंबंधात, पुढे नमूद केलेल्या बाबी पूर्ण केल्याशिवाय कोणताही आदेश देता येणार नाही, -

(क) कर्मचा-याविरुध्द करावयाचे प्रस्तावित केलेली कार्यवाही व गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या ज्या आरोपांमुळे प्रस्तावित शिक्षा देण्याचे प्रस्तावित केले असेल ते आरोप लेखी कळवणे आणि प्रस्तावित शिक्षेविरुध्द अभिवेदन करण्याची त्याची इच्छा असेल त्याप्रमाणे तसे अभिवेदन करण्यास त्याला संधी देणे;

(ख) शिस्तभंगविषयक प्राधिका-याच्या मते ज्या प्रकरणी चौकशी आवश्यक असेल अशा प्रत्येक प्रकरणी, विनियम १२ च्या पोटविनियम (३) ते (२३) मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार चौकशी करणे;

(ग) खंड (क) अन्वये कर्मचा-याने कोणतेही अभिवेदन केले असल्यास, ते अभिवेदन आणि खंड (ख) अन्वये चौकशी केली असल्यास, त्या चौकशीचा अहवाल विचारात घेणे; आणि

(घ) गैरवर्तणुकीच्या किंवा गैरवर्तनाच्या प्रत्येक आरोपाचा निष्कर्ष नमूद करणे.

(२) अशा प्रकरणांच्या कार्यवाहीच्या अभिलेखात पुढील बाबींचा समावेश असेल -

(क) कर्मचा-याला त्याच्यावर करण्यात येणा-या कार्यवाही संबंधीच्या प्रस्तावाच्या सूचनेची प्रत;

(ख) गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन याबाबतच्या विवरणपत्राची कर्मचा-याला देण्यात आलेली प्रत;

(ग) कर्मचा-याने कोणतेही अभिवेदन दिले असल्यास, ते अभिवेदन;

(घ) चौकशीमध्ये सादर करण्यात आलेला पुरावा;

(ङ) गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन यासंबंधातील प्रत्येक आरोपावरील निष्कर्ष; आणि

(च) प्रकरणांवरील आदेश व त्यांची कारणे.

(३) पोटविनियम (१) च्या खंड (ख) च्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कर्मचा-याने अभिवेदन केले असल्यास, ते अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्याच्या वेतनवाढी तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी रोखून ठेवण्याचे किंवा कोणत्याही कालावधीसाठी संचयी परिणामासह वेतनवाढी रोखून ठेवण्याचे प्रस्तावित केले असेल तर किंवा जर अशा वेतनवाढी रोखून ठेवण्यामुळे, अशा कर्मचा-याला देय असलेल्या निवृत्तीवेतनाच्या रकमेवर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल तर, कर्मचा-याला अशी कोणतीही शिक्षा देण्यापूर्वी विनियम १२ च्या पोटविनियम (३) ते (२३) मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीनुसार चौकशी करण्यात येईल.

**१५. कर्मचा-यास आदेश कळविणे -** शिस्तभंगविषयक प्राधिका-याने दिलेले आदेश कर्मचा-यास कळविण्यात येतील, त्याचबरोबर प्राधिका-याने केलेल्या कोणत्याही असल्यास चौकशीच्या अहवालाची एक प्रत देण्यात येईल आणि दोषारोपाच्या प्रत्येक बाबीसंबंधातींल निष्कर्षाची एक प्रत किंवा शिस्तभंगविषयक प्राधिकारी हा, स्वत: चौकशी प्राधिकारी नसेल त्या बाबतीत, चौकशी प्राधिका-याने दिलेल्या अहवालाची एक प्रत आणि शिस्तभंग विषयक प्राधिकारी जेव्हा चौकशी अधिका-याच्या निष्कर्षांशी सहमत नसेल तेव्हा त्याची संक्षिप्त कारणे चौकशी प्राधिका-याने काढलेल्या निष्कर्षांसह त्यांच्या निष्कर्षांचे विवरण, त्याला देण्यात येईल.

१६. **एकत्रित कार्यवाही -** (१) ज्या प्रकरणात, दोन किंवा अधिक कर्मचारी संबंधित असतील अशा बाबतीत, अध्यक्ष किंवा अशा सर्व कर्मचा-यांना सेवेतून बडतर्फ करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी, एकत्रित कार्यवाही करून त्या सर्व कर्मचा-यांविरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याचा आदेश देऊ शकेल.

**टीप: जर अशा कर्मचा-यांना बडतर्फ करण्याची शिक्षा देण्यास सक्षम असलेले प्राधिकारी वेगवेगळे असतील तर अशा प्राधिका-यांपैकी सर्वोच्च असणारा प्राधिकारी, इतर प्राधिका-यांच्या संमतीने, एकत्रित कार्यवाही करून शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याचा आदेश देऊ शकेल.**

(२) अधिनियमाच्या कलम २५ च्या पोट कलम (१) च्या आणि या विनियमांच्या विनियम १० च्या तरतुदींस अधीन राहून अशा आदेशात पुढील बाबी विनिर्दिष्ट करण्यात येतील:

(एक) अशी एकत्रित कार्यवाही करण्याच्या प्रयोजनार्थ शिस्तभंगविषयक प्राधिकारी म्हणून काम पाहणारा प्राधिकारी;

(दोन) असा शिस्तभंगविषयक प्राधिकारी ज्या शिक्षा देण्यास सक्षम असेल अशा विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा; आणि

(तीन) कार्यवाही करताना विनियम १२ आणि १३ किंवा विनियम १४ अथवा विनियम १९ यामध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबण्यात येईल किंवा कसे.

१७. **विवक्षित प्रकरणांमधील विशेष कार्यपध्दती -** विनियम १२ ते १६ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी -

(एक) जेव्हा कर्मचा-याच्या ज्या वर्तणुकीमुळे/वर्तनामुळे त्याच्यावर गुन्हयाचा आरोप ठेवण्यात येऊन तो दोषी ठरला असेल व त्याला कोणतीही शिक्षा देण्यात आली असेल त्याबाबतीत; किंवा

(दोन) जेव्हा, त्या बाबतची कारणे नमूद करून या विनियमांमध्ये तरतूद केलेल्या रीतीने चौकशी करणे वाजवी रीतीने व्यवहार्य ठरत नाही अशी शिस्तभंगविषयक प्राधिका-याची खात्री पटली असेल व त्याने त्याबाबतची कारणे लेखी नमूद केलेली असतील त्याबाबतीत; किंवा

(तीन) जेव्हा बंदराच्या सुरक्षिततेच्या हिताच्या दृष्टीने अशी पध्दत अनुसरणे इष्ट नाही अशी अध्यक्षाची खात्री पटली असेल, त्याबाबतीत,

शिस्तभंगविषयक प्राधिकारी, प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेईल आणि त्यासंबंधी त्यास योग्य वाटेल असे आदेश देईल.

परंतु, अधिनियमाच्या कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये समाविष्ट असलेल्या कर्मचा-याच्या संबंधात असे आदेश देण्यापूर्वी केंद्र सरकारची मंजुरी घेण्यात येईल.

**१८. केंद्र सरकार, इत्यादींना ज्यांच्या सेवा उसन्या दिलेल्या असतील अशा कर्मचा-यांच्या बाबतीतील तरतुदी -**

(१) जेव्हा एखाद्या कर्मचा-याची सेवा, केंद्र सरकारला किंवा राज्य शासनाला अथवा त्याला दुय्यम असणा-या प्राधिकरणाला किंवा स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाला (या विनियमात ज्याचा उल्लेख "उसनी सेवा घेणारे प्राधिकरण" असा केला आहे) उसनी दिलेली असेल तेव्हा, अशी उसनी सेवा घेणा-या प्राधिकरणाला त्याच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्याच्या प्रयोजनाकरिता नियुक्ती प्राधिकारी म्हणून अधिकार असेल.

परंतु, सेवा उसनी घेणारा प्राधिकारी, अशा कर्मचा-याला निलंबित करण्याचा आदेश देण्यास, किंवा यथास्थिति त्याच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु करण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती अध्यक्षाला तात्काळ कळवील.

(२) कर्मचा-याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करताना काढण्यात आलेले निष्कर्ष विचारात घेता -

(एक) जर विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा कर्मचा-याला देण्यात यावी असे उसनी सेवा घेणा-या प्राधिकरणाचे असे मत असेल तर, ते अध्यक्षाशी विचारविनिमय केल्यानंतर, त्यास आवश्यक वाटतील असे आदेश देऊ शकेल;

परंतु, सेवा उसनी घेणारे प्राधिकरण आणि अध्यक्ष यांच्यामध्ये काही मतभेद असतील, तर अशा कर्मचा-याची सेवा मंडळाकडे परत करण्यात यतील.

(दोन) विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा कर्मचा-यास देण्यात यावी असे, सेवा उसनी घेणा-या प्राधिकरणाचे मत असेल तर, ते प्राधिकरण त्याची सेवा मंडळाकडे परत करील आणि चौकशीविषयक कामकाजही अध्यक्षाकडे हस्तांतरित करील आणि त्यानंतर अध्यक्ष, त्याला योग्य वाटतील असे आदेश काढील:

परंतु, असा कोणताही आदेश काढण्यापूर्वी, अध्यक्ष, विनियम १३ च्या पोटविनियम (३) आणि (४) च्या तरतुदींचे अनुपालन करील:

परंतु आणखी असे की, जेथवर असा कोणताही आदेश, अधिनियमाच्या कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्देश केलेल्या कर्मचा-याच्या संबंधात असेल तेथवर केंद्र सरकारच्या मंजुरीखेरीज तो अंमलात येणार नाही.

**स्पष्टीकरण :** शिस्तभंगविषयक प्राधिकारी, सेवा उसनी घेणा-या प्राधिकरणाने त्याच्याकडे पाठवलेल्या चौकशी अभिलेखाच्या आधारे किंवा विनियम १२ नुसार शक्य असेल तेथवर त्याला आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, या खंडाखालील आदेश काढू शकेल.

## १९. केंद्र सरकार, इत्यादींकडून सेवा उसनी घेतलेल्या कर्मचा-याच्या संबंधातील तरतुदी-

(१) जेव्हा एखाद्या कर्मचा-याची सेवा केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून किं वा त्याला दुय्यम असणा-या प्राधिकरणाकडून अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा इतर प्राधिकरणाकडून उसनी घेतली असेल, त्याबाबतीत त्याची सेवा देऊ करणा-या प्राधिकरणाला (यात यापुढे ज्याचा निर्देश "सेवा देऊ करणारे प्राधिकरण" असा केला आहे), अशा कर्मचा-याविरूध्द निलंबनाचा आदेश दिलेला असेल किंवा शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु केलेली असेल तेव्हा, ज्या परिस्थितिमुळे कर्मचा-याचा निलंबनाचा आदेश काढावा लागला किंवा यथास्थिति, त्याच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरुकरावी लागली असेल त्या परिस्थितीची माहिती, तात्काळ कळविण्यात येईल.

(२) कर्मचा-याविरूध्द केलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील निष्कर्ष विचारात घेऊन, -

(एक) जर विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कर्मचा-याला कोणतीही शिक्षा देण्याचे ठरविण्यात आले असेल तर, शिस्तभंगविषयक प्राधिकारी, विनियम १३ च्या पोट विनियम (३) च्या तरतुदींस अधीन राहून, सेवा उसनवार देणा-या प्राधिकरणाशी विचारविनिमय केल्यानंतर या प्रकरणात त्याला आवश्यक वाटतील त्याप्रमाणे आदेश देईल.

परंतु सेवा उसनी घेणारे प्राधिकरण आणि सेवा देऊ करणारे प्राधिकरण या दोघांमध्ये मतभेद असतील तर, कर्मचा-याची सेवा, सेवा उसनवार देणा-या प्राधिकरणाकडे परत करण्यात येतील.

(दोन) जर विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा, कर्मचा-याला देण्यात यावी असे शिस्तभंगविषयक प्राधिका-याचे मत असेल तर, तो प्राधिकारी, सेवा उसनवार देणा-या प्राधिकरणाकडे अशा कर्मचा-याची सेवा परत करील आणि त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता चौकशीचे कामकाज हस्तांतरित करील.

**भाग VII**

# अपिले

२०. **ज्याविरूध्द अपील करता येत नाही असे आदेश -** या भागात काहीही अंतर्भूत असले तरी, पुढील बाबतीत, कोणतेही अपील दाखल करता येणार नाही-

(एक) केंद्र सरकारने दिलेला कोणताही आदेश;

(दोन) अपिलातील कोणताही आदेश किंवा अध्यक्षाने पुनरीक्षणात दिलेला कोणताही आदेश;

(तीन) विनियम १२ खालील चौकशी करताना, चौकशी प्राधिका-याने दिलेला कोणताही आदेश;

(चार) निलंबनाच्या आदेशाव्यतिरिक्त, शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील वादकालीन स्वरूपाचा किंवा उपाययोजनाकारी स्वरूपाचा किंवा प्रकरण अंतिमरित्या निकालात काढण्याबाबत कोणताही आदेश.

२१. **ज्याविरूध्द अपील करता येते असे आदेश -** विनियम २० च्या तरतुदींच्या अधीन राहून, कर्मचारी, पुढीलपैकी सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही आदेशाविरूध्द अपील दाखल करुशकेल:-

(एक) विनियम ७ अन्वये काढलेला किंवा काढला असल्याचे मानण्यात येणारा निलंबनाचा आदेश;

(दोन) शिस्तभंगविषयक प्राधिका-याने विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शिक्षा ठोठावण्यासाठी काढलेला आदेश;

(तीन) ज्या आदेशामुळे -

(क) विनियमांद्वारे विनियमित केलेले त्याचे वेतन, भत्ते, निवृत्तिवेतन किंवा इतर सेवाशर्ती त्याला अहितकारक ठरतील, अशाप्रकारे नाकारण्यात येतात किंवा त्यामध्ये बदल करण्यात येतो; किंवा

(ख) अशा कोणत्याही विनियमांच्या तरतुदींचा त्याला फायदेशीर नसेल अशा प्रकारे अर्थ लावण्यात येतो, असा आदेश;

(चार) ज्या आदेशामुळे -

(क) कर्मचारी, दक्षता रोध पार करण्यास अक्षम असल्याच्या कारणावरून समयश्रेणी वेतनातील दक्षता रोधावर त्याचे वेतन थांबवण्यात येते;

(ख) शिक्षा म्हणून नव्हे तर अन्यथा, तो उच्च सेवेत, श्रेणीत किंवा पदावर स्थानापन्न असताना निम्न श्रेणीतील सेवेत, श्रेणीत किंवा पदावर त्यास पदावनत करण्यात येते;

(ग) विनियमांनुसार त्याला अनुज्ञेय असणारे कमाल निवृत्तीवेतन कमी करण्यात येते किंवा रोखून ठेवण्यात येते किंवा नाकारण्यात येते;

(घ) त्याच्या निलंबनाच्या कालावधीकरिता किंवा तो निलंबनाधीन असल्याचे मानले जाते, त्या कालावधीकरिता किंवा त्यातील कोणत्याही भागाकरिता त्याला द्यावयाचा निर्वाह भत्ता व इतर भत्ते निश्चित करण्यात येतात;

(ङ) (एक) निलंबनाधीन कालावधीकरिता, किंवा

(दोन) त्याला बडतर्फ केल्याच्या, सेवेतून काढून टाकल्याच्या किंवा सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून किंवा त्याला निम्न श्रेणीच्या सेवेत, पदावर किंवा समय वेतनश्रेणीत किंवा समय वेतनश्रेणीतील टप्प्यावर पदावनत केल्याच्या तारखेपासून त्याला त्याच्या सेवेत,

श्रेणीत किंवा पदावर पुन:स्थापित करण्याच्या किंवा पूर्ववत घेण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीकरिता,

त्याचे वेतन व भत्ते निश्चित करण्यात येतात; किंवा

(च) त्याला निलंबित केल्याच्या तारखेपासून किंवा बडतर्फ केल्याच्या, सेवेतून काढून टाकल्याच्या, सक्तीने सेवानिवृत्त केल्याच्या तारखेपासून किंवा निम्न श्रेणीतील सेवेत, पदावर, समय वेतनश्रेणीत किंवा समय वेतनश्रेणीतील टप्प्यावर पदावनत केल्याच्या तारखेपासून त्याला त्याच्या, श्रेणीत किंवा पदावर पुन:स्थापित केल्याच्या किंवा पूर्ववत घेतल्याच्या तारखेपर्यंतचा कालावधी हा, कोणत्याही प्रयोजनासाठी त्याने कर्तव्यार्थ व्यतीत केलेला कालावधी मानले जाईल किंवा कसे, हे ठरविण्यात येते,

असा आदेश;

**स्पष्टीकरण:** या विनियमामध्ये -

(एक) "कर्मचारी" या संज्ञेत, मंडळाच्या सेवेत असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीचाही समावेश होतो;

(दोन) "निवृत्तीवेतन" या संज्ञेत अतिरिक्त निवृत्तीवेतन, उपदान व अन्य कोणतेही सेवानिवृत्ती लाभ यांचा समावेश होतो.

## २२. अपील प्राधिकारी -

मंडळाच्या सेवेत असण्याचे बंद झालेल्या व्यक्तीसह कोणताही कर्मचारी -

(एक) निलंबनाच्या आदेशाविरूध्दचे अपील, निलंबनाचे आदेश देणा-या किंवा दिल्याचे मानण्यात येणा-या प्राधिका-याच्या निकटच्या दुय्यम प्राधिका-याकडे करता येईल;

(दोन) विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देणा-या आदेशाविरूध्द चे अपील, अनुसूचीत या संदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिका-याकडे करता येईल;

(तीन) विनियम २० च्या खंड (तीन) आणि (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही आदेशाविरूध्दचे अपील, बडतर्फीच्या शिक्षेच्या

आदेशाविरुध्दचे अपील ज्या प्राधिका-याकडे केले आहे, त्याच प्राधिका-याकडे करता येईल.

## २३. विशिष्ट परिस्थितीतील अपील प्राधिकारी -

विनियम २२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,

(एक) एकत्रित कार्यवाहीतील आदेशाविरुध्द करावयाचे अपील हे, त्या कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, शिस्तभंगविषयक प्राधिकारी म्हणून कार्य करणा-या प्राधिका-याला निकट दुय्यम असणा-या प्राधिका-याकडे केले पाहिजे;

(दोन) ज्याविरुध्द अपील करण्यात आले असेल, तो आदेश ज्या व्यक्तीने काढला असेल ती व्यक्ती नंतरच्या तिच्या नियुक्तीमुळे अध्यक्ष झाली असेल तर, अशा आदेशाविरुध्दचे अपील, केंद्र सरकारकडे केले पाहिजे आणि त्या अपिलाच्या संबंधात केंद्र सरकार हे, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, अपील प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.

## २४. अपीलांकरिता कालमर्यादा -

ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रत, अपीलकर्त्याला मिळाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या कालावधीत, असे अपील केले नाही तर, या भागाअन्वये करण्यात आलेले कोणतेही अपील विचारात घेतले जाणार नाही:

परंतु, अपीलकर्त्याला ठराविक मुदतीत अपील सादर न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत, अपील प्राधिका-याची खात्री पटली तर उक्त कालावधी संपल्यानंतरही तो अपील स्वीकारुशकेल.

## २५. अपिलाचा आकार -

(१) अपील करणा-या प्रत्येक व्यक्तीने, आपले अपील स्वतंत्रपणे आणि आपल्या स्वत:च्या नावाने केले पाहिजे.

(२) (क) ज्या आदेशाविरूद्ध अपील दाखल केले असेल तो आदेश काढणा-या प्राधिका-याला ते सादर केले पाहिजे. ज्याविरुध्द अपील दाखल केले आहे, तो आदेश देणा-या प्राधिका-याकडे अपीलकर्त्याने अपीलाची एक प्रत पाठवावी.

(ख) हे अपील स्वयंपूर्ण असले पाहिजे आणि त्यामध्ये, ज्या मुद्यांवर अपीलकर्त्याचा विशेष भर असेल अशा सर्व महत्वाच्या विधानांचा आणि युक्तिवादाचा समावेश असला पाहिजे. परंतु, त्यात वापरलेली भाषा अवमानकारक किंवा अशिष्ट नसावी.

(३) ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात आले असेल, तो आदेश काढणारा प्राधिकारी, अपिलाची प्रत मिळाल्यानंतर विनाविलंब आणि अपील प्राधिका-याकडून कोणताही निदेश मिळण्याची वाट न पाहता, ते अपील त्यावरील आपल्या भाष्यासह आणि संबंध्द अभिलेखासह अपील प्राधिका-याकडे पाठवील.

## २६. अपिलावरील विचारविनिमय -

(१) निलंबनाच्या आदेशाविरूध्द केलेल्या अपिलाच्या बाबतीत, अपील प्राधिकारी, विनियम ७ च्या तरतुदी विचारात घेता आणि प्रकरणाची परिस्थिति लक्षात घेऊन, निलंबनाचा आदेश समर्थनीय आहे किंवा नाही यावर विचार करील आणि त्यानुसार तो आदेश कायम ठेवील किंवा रद्द करील.

(२) विनियम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी कोणतीही शिक्षा देणा-या किंवा उक्त विनियमानुसार दिलेली कोणतीही शिक्षा वाढवणा-या आदेशांविरूध्द अपील केले असेल त्याबाबतीत, अपील प्राधिकारी -

(क) या विनियमांमध्ये घालून दिलेल्या कार्यपध्दतीचे अनुपालन केले आहे किंवा कसे, आणि तसे अनुपालन केलेले नसल्यास, न्यायात कसूर झाली आहे काय;

(ख) शिस्तभंगविषयक प्राधिका-याने काढलेल्या निष्कर्षाच्या बाबतीत, अभिलेखातील पुरावा समर्थनीय आहे किंवा कसे; आणि

(ग) लादलेली शिक्षा ही पुरेशी आहे, अपुरी आहे की कडक आहे किंवा कसे,

याबाबत विचार करील; आणि -

(एक) शिक्षा कायम करणारा, वाढवणारा, कमी करणारा किंवा रद्द करणारा आदेश काढील; किंवा

(दोन) शिक्षा देणा-या किंवा वाढीव शिक्षा देणा-या प्राधिका-याकडे किंवा इतर कोणत्याही प्राधिका-याकडे, त्या प्रकरणाच्या परिस्थितीत त्याला योग्य वाटतील अशा निदेशांसह पाठविणारा आदेश देईल.

परंतु -

(एक) जर अपील प्राधिका-याने, जी वाढीव शिक्षा देण्याचे योजिले असेल ती शिक्षा विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी एक असेल आणि प्रस्तुत प्रकरणी विनियम १२ अन्वये आधीच चौकशी करण्यात आली नसेल तर, अपील प्राधिकारी, विनियम १७ च्या तरतुदींस अधीन राहून, स्वत:च अशी चौकशी करील किंवा विनियम १२ च्या तरतुदींनुसार अशी चौकशी करण्यात यावी, असा निदेश देईल आणि त्यानंतर अशा चौकशीची कार्यवाही विचारात घेऊन आणि त्याला विनियम १३ च्या पोट-विनियम (४) च्या तरतुदींनुसार शक्य असेल तेथवर, अशा चौकशीच्या कालावधी दरम्यान सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे, प्रस्तावित शिक्षेविरूध्द अपीलकर्त्याला अभिवेदन सादर करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटतील असे आदेश देईल;

(दोन) जर अपील प्राधिका-याने, जी वाढीव शिक्षा देण्याचे योजले असेल ती शिक्षा विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षांपैकी एक असेल आणि प्रस्तुत प्रकरणी विनियम १२ अन्वये आधीच चौकशी करण्यात आली असेल तर, अपील प्राधिकारी, विनियम १३ च्या पोट-विनियम (४) च्या तरतुदींनुसार, शक्य असेल तेथवर, चौकशीच्या कालावधीत सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे, अपीलकर्त्याला प्रस्तावित शिक्षेविरूध्द अभिवेदन सादर करण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटतील असे आदेश देईल; आणि

(तीन) शक्य असेल तेथवर अपीलकर्त्याला, विनियम १२ च्या तरतुदींनुसार अशा वाढीव शिक्षेविरूद्ध अभिवेदन सादर करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज इतर कोणत्याही प्रकरणी वाढीव शिक्षा ठोठावणारा आदेश काढता येणार नाही.

(३) विनियम २१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आदेशाविरूध्द केलेल्या अपीलामध्ये, अपील प्राधिकारी, प्रकरणाच्या संपूर्ण परिस्थितीचा विचार करील आणि त्याला न्याय्य व नि:पक्षपाती वाटतील असे आदेश काढील.

२७. **अपिलातील आदेशांची अंमलबजावणी -** ज्या आदेशाविरूध्द अपील करण्यात आले असेल तो आदेश काढणारा प्राधिकारी, अपील प्राधिकरणाने संमत केलेले आदेश अंमलात आणील.

## भाग VIII

# पुनर्विलोकन

२८. **पुनर्विलोकन-** (१) या विनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी -

(एक) केंद्र सरकार, किंवा

(दोन) अध्यक्ष

कोणत्याही वेळी स्वत:हून किंवा अन्यथा, कोणत्याही चौकशीचा अभिलेख मागवू शकेल आणि या विनियमांनुसार किंवा विनियम ३१ अन्वये निरसित केलेले विनियम किंवा आदेश किंवा पध्दतीनुसार, ज्या आदेशाविरुध्द अपील करता येते, परंतु असे कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नसेल अशा कोणत्याही आदेशाचे अथवा ज्या आदेशाविरुध्द अपील करता येत नाही अशा प्रकरणी, जेथे आवश्यक असेल तेथे केंद्र सरकारशी विचार विनिमय केल्यानंतर अशा आदेशाचे पुनर्विलोकन करुशकतील, आणि -

(क) तो आदेश कायम करता येईल, त्यात सुधारणा करता येतील किंवा तो रद्द करता येईल; किंवा

(ख) त्या आदेशाद्वारे देण्यात आलेली शिक्षा कायम करता येईल, कमी करता येईल, वाढवता येईल किंवा रद्द करता येईल अथवा जेथे कोणतीही शिक्षा देण्यात आली नसेल तेथे शिक्षा लादता येईल; किंवा

(ग) ते प्रकरण, ज्याने आदेश दिला असेल त्या प्राधिका-याकडे किंवा अशा प्राधिका-यास, प्रकरणाच्या परिस्थितीनुरुप त्याला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करण्याचा निदेश देऊन अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे परत पाठवू शकेल, किंवा

(घ) त्याला योग्य वाटतील असे इतर आदेश देऊ शकेल:

परंतु, संबंधित कर्मचा-याला, त्याच्यावर लादण्याचे प्रस्तावित शिक्षेविरुध्द अभिवेदन करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज, कोणत्याही पुनर्विलोकन प्राधिका-याला, कोणतीही शिक्षा लादणारा किंवा शिक्षेत वाढ करणारा कोणताही आदेश काढता येणार नाही, आणि जेव्हा विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा लादण्याचे किंवा ज्या आदेशाचे

पुनर्विलोकन करावयाचे आहे अशा आदेशाद्वारे केलेली शिक्षा वाढवून त्या खंडात विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शिक्षा करण्याचे योजले असेल त्याबाबतीत, विनियम १२ मध्ये निर्धारित केलेल्या पध्दतीने चौकशी करण्यात आल्याशिवाय आणि त्यानंतर, अशा चौकशीमध्ये दाखल करण्यात आलेल्या पुराव्यावरून, संबंधित कर्मचा-याला प्रस्तावित शिक्षेविरूध्द कारणे दाखविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय आणि आवश्यक असेल तेथे केंद्र सरकारशी विचारविनिमय करण्यात आल्याखेरीज, अशी कोणतीही शिक्षा लादता येणार नाही:

परंतु, आणखी असे की, अध्यक्षाला, -

(एक) अपिलातील आदेश ज्याने काढला असेल तो प्राधिकारी, किंवा

(दोन) ज्या प्राधिका-याकडे अपील करता आले असते त्याच्याकडे अपील दाखल करण्यात आलेले नसेल अशा बाबतीत -

तो प्राधिकारी त्याला दुय्यम असल्याखेरीज अन्यथा, पुनर्विलोकनाच्या अधिकारांचा वापर करता येणार नाही.

(२) पुनर्विलोकनासंबंधीची कोणतीही कार्यवाही, -

(एक) अपिलाकरिता असलेली कालमर्यादा संपेपर्यंत,

(दोन) जेथे असे कोणतेही अपील दाखल करण्यात आले असेल तेथे, ते निकालात काढले जाईपर्यंत,

सुरूकरता येणार नाही.

(३) पुनर्विलोकन अर्जावर, तो या विनियमांखाली करण्यात आलेले अपील आहे असे समजून त्याच रीतीने कार्यवाही करण्यात येईल.

**भाग IX**

## संकीर्ण

### २९. आदेश, नोटीसा, इत्यादींची बजावणी -

या विनियमांन्वये दिलेला प्रत्येक आदेश, काढलेली नोटीस आणि इतर आदेशिका, संबंधित कर्मचा-याला व्यक्तिशः देण्यात येतील किंवा त्याच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठवण्यात येईल.

**३०. कालमर्यादा शिथिल करण्याचा आणि विलंब क्षमापित करण्याचा अधिकार-**

या विनियमांमध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करून, या विनियमांन्वये कोणताही आदेश देण्यास सक्षम असणारा प्राधिकारी, सबळ व पुरेशा कारणांकरिता किंवा पुरेसे कारण दर्शवण्यात आले असेल तर, या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी वाढवून देऊ शकेल किंवा झालेला कोणताही विलंब क्षमापित करुशकेल.

**३१. निरसन** -

(१) या विनियमांच्या प्रारंभानंतर, या विनियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले मुंबई पोर्ट ट्रस्ट नियमांच्या नियम २३, २४, २५ आणि २८ आणि निरधिसूचित कर्मचा-यांचे विनियम व उक्त नियमांद्वारे आणि निरधिसूचित कर्मचा-यांच्या विनियमांद्वारे ज्या कर्मचा-यांचे नियमन करण्यात येत होते अशा कर्मचा-यांच्या संबंधातील त्याच्या परिशिष्ट 'ई' आणि इतर सर्व कर्मचा-यांच्या संबंधात या विनियमांच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले आदेश व उपयोजन निरसित करण्यात येत आहेत.

परंतु -

(क) अशा निरसनामुळे, उक्त नियमांच्या व निरधिसूचित कर्मचारीवर्गाच्या विनियमांच्या किंवा उक्त आदेश अथवा परियोजन यांच्या पूर्वीच्या प्रवर्तनावर किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टींवर किंवा कोणत्याही कार्यवाहीवर परिणाम होणार नाही;

(ख) या विनियमांच्या प्रारंभापूर्वी, उक्त नियमांन्वये किंवा निरधिसूचित कर्मचारीवर्गाच्या विनियमांन्वये अथवा उक्त आदेशांन्वये अथवा उपयोजनांन्वये प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही, पुढे चालू ठेवण्यात येईल आणि शक्य असेल तेथवर, या विनियमांच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यात येईल.

(2) या विनियमांच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेल्या आदेशाविरुद्ध या विनियमांच्या प्रारंभानंतर प्रलंबित असलेले किंवा केलेले एखादे अपील, या विनियमांनुसार विचारात घेण्यात येईल आणि त्यावर या विनियमांनुसार आदेश देण्यात येतील.

३२. **शंका निरसन** - जेव्हा या विनियमांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचा अन्वयार्थ लावण्यासंबंधात शंका उद्भवल्यास, ती बाब, शंकानिरसनार्थ, अध्यक्षाकडे पाठविण्यात येईल आणि तो त्यावर निर्णय घेईल.

----------

# अनुसूची

| विद्यमान तरतुदी | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **कर्मचा-यांचा प्रवर्ग** | **शिक्षा लादण्यास सक्षम असलेला प्राधिकारी आणि तो लादू शकेल अशा शिक्षा (विनियम ८ च्या खंड (एक) ते (नऊ) मधील संदर्भासह)** | | **अपील प्राधिकारी** |
| | | **प्राधिकारी** | **शिक्षा** | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | अधिनियमाच्या कलम २४ च्या पोटकलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले पद धारण करणारा कर्मचारी | (एक) अध्यक्ष<br><br>(दोन) केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने अध्यक्ष | (एक)विनियम ८ च्या खंड (एक) ते (चार) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा.<br><br>(दोन)विनियम ८ च्या खंड (पाच) ते (नऊ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा. | केंद्र सरकार |
| २. | ज्यांचे कमाल वेतन (भत्ते वगळून) रु१६७५० इतके आहे परंतु ज्यांचा समावेश अ.क्र.१ मध्ये होऊ शकत नाही असे वर्ग एकचे पद धारण करणारे कर्मचारी. | अध्यक्ष | सर्व | केंद्र सरकार |
| ३. | (एक)वर्ग एकचे पद धारण करणारे परंतु अ.क्र.१ व अ.क्र.२ मध्ये समाविष्ट न होणारे कर्मचारी.<br><br>(दोन)वर्ग दोनचे पद धारण करणारे कर्मचारी. | उपाध्यक्ष | सर्व | अध्यक्ष |

| विद्यमान तरतुदी | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कर्मचा-यांचा प्रवर्ग | शिक्षा लादण्यास सक्षम असलेला प्राधिकारी आणि तो लादू शकेल अशा शिक्षा (विनियम ८ च्या खंड (एक) ते (नऊ) मधील संदर्भासह) | | अपील प्राधिकारी |
| | | प्राधिकारी | शिक्षा | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| ४. | ज्यांचे कमाल वेतनमान (भत्ते वगळून) रु९५०० पेक्षा अधिक असेल असे वर्ग तीनचे पद धारण करणारे कर्मचारी. | विभागप्रमुख | सर्व | उपाध्यक्ष |
| ५. | (एक)वर्ग तीनचे पद धारण करणारे परंतु अ.क्र.४ मध्ये समाविष्ट न होणारे कर्मचारी; आणि<br><br>(दोन)वर्ग चारची पदे धारण करणारे कर्मचारी | विभागप्रमुख किंवा विभागप्रमुख वेळोवेळी नामनिर्दिष्ट करील असा उप विभागप्रमुखाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल असा अधिकारी (असे अधिकारी) | सर्व | (एक)जेव्हा विभागप्रमुख वेळोवेळी नामनिर्दिष्ट करील असा उप विभागप्रमुखाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसेल अशा अधिका-याने किंवा अधिका-यांनी शिक्षा लादली असेल, तेव्हा विभागप्रमुख.<br><br>(दोन) जेव्हा विभागप्रमुखाने शिक्षा लादली असेल तेव्हा उपाध्यक्ष. |

----------------